Pimpri Chinchwad Police Commissionerate

# प्रेस नोट ता. १७/०९/२०२०

## घरफोडी, वाहन चोरी, जबरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन अटक,०५ गुन्हे उघड

### एकुण १,५८,५००/- रु. किं चे ०८ मोबाईल फोन व मोटारसायकल जप्त

मा.पोलीस आयुक्त सो, पिपरी-चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड परिसरात घडणारे वाहन चोरी, जबरी चोरी व घरफोडीच्या गुन्हयास प्रतिबंध करुन घडलेले गुन्हे उघडकिस आणण्याचे आदेश दिल्याने पिंपरी चिंचवड गुन्हे शाखा युनिट ४ चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक मोहन शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली रेकॉर्ड वरील वाहन चोरीचे व इतर गुन्हेगार यांची तपासणी सुरू असताना **पोना/ वासुदेव मुंढे व पोशि/२७२० सुखदेव गावंडे** यांना गुप्तबातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तलयाच्या रेकॉर्डवरील एक सराईत गुन्हेगार हा चोरी केलेले मोबाईल फोन विकण्यासाठी एका मोटारसायकलवर डांगे चौकात येणार आहे अशी बातमी मिळाल्याने वपोनि मोहन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख व स्टाफने सराईत गुन्हेगार नामे **संदेश प्रभाकर पाटोळे, वय-२२ वर्षे, रा-साईराज कॉलनी, जे. बी. कंन्स्ट्रक्शनचे बाजुला, बिजलीनगर, चिंचवड, पुणे.** यास ताब्यात घेतले तेव्हा त्याचे कडे एक यामाहा एफ झेड मोटारसायकल व विविध कंपन्यांचे ०८ मोबाईल फोन मिळुन आले. त्याचे कडे केलेल्या तपासात सदरची मोटारासायकल ही त्याने म्हाळुंगे परिसरातुन चोरी केल्याचे व तो सदर मोटारसायकलचा नंबर बदली करुन ती वापरत असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच मिळुन आलेल्या मोबाईल फोन पैकी ०७ मोबाईल फोन हे त्याने म्हाळुंगे परिसरातुनच कामगार वर्ग राहत असलेल्या वस्त्यांमधुन चोरी केल्याचे व ०१ मोबाईल फोन हा त्याचा साथिदार नामे हारिष जारवाल, रा-चिंचवड याच्यासह निगडी पोलीस ठाणे हद्दित फोनवर पायी बोलत जाणाऱ्या एका इसमाकडुन हिसकावुन चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर आरोपी कडुन ०१ मोटारसायकल तसेच विविध कंपन्यांचे एकुण ०८ मोबाईल फोन असा एकुण १,५८,५००/- रु. किं. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन त्याचेकडुन खालिल गुन्हे उघड झाले आहेत.

**१) चिखली पोलिस स्टेशन गु.र.क्र. ३४१/२०२० भा.द.वि. कलम ३९२,३४**
**२) चाकण पोलिस स्टेशन गु.र.क्र. १०१९/२०२० भा.द.वि. कलम ४५७,३८०**
**३) म्हाळुंगे पो.चौकी चाकण पोलिस स्टेशन गु.र.क्र. १०२०/२०२० भा.द.वि. कलम ३८०**
**४) म्हाळुंगे पो.चौकी चाकण पोलिस स्टेशन गु.र.क्र. १०२१/२०२० भा.द.वि. कलम ३८०**
**५) म्हाळुंगे पो.चौकी चाकण पोलिस स्टेशन गु.र.क्र. ९९०/२०२० भा.द.वि. कलम ३७९**

सदरचा आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरुद्ध यापुर्वी घरफोडी, जबरीचोरी तसेच वाहन चोरीचे एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे सो, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ सो, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील गुन्हे यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, अदिनाथ मिसाळ पोना/ संतोष असवले, तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश

जायभाये, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, गुन्हे शाखा युनिट-४ यांनी केली आहे.

